निशानी ११ अर्जावरील आदेश.
(दिनांक १८.१२.२०२४ रोजी पारीत)

अर्जदार क्र. ०१ शारदा महेश कावळे हिने प्रस्तूतचा अर्ज तिचेसाठी व अर्जदार क्र. ०२ कु. श्री महेश कावळे यांना कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे सरंक्षण कायदाचे कलम २३ नुसार अंतरीम पोटगी रक्कम अनुक्रमे १५,०००/— व ५,०००/— मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार क्र. १ च्या अर्ज कथनानुसार दि. ०५.०४.२०२१ रोजी तिचे व गैरअर्जदार क्र. ०१ महेश कावळे यांचे लग्न झाले असून लग्नानंतर ती गडचिरोली येथे गैरअर्जदाराच्या घरी नांदावयास गेली. लग्नानंतर गैरअर्जदार क्र. ०१ च्या आई वडीलांनी व त्याच्या कुटुंबातील लोकांनी तिला शारिरीक व मानसिक त्रास देणे सुरू केले. ते तिला निरनिराळया प्रकारे टोंमणे मारत असत. त्यानंतर अर्जदाराचे वडील तिचे घरी आले तेव्हा गैरअर्जदाराने तिला चांगले नांदवण्याची त्यांना हमी दिली. दि. ०७.०६.२०२२ रोजी अर्जदार क्र. ०१ व गैरअर्जदार क्र. ०१ यांना अर्जदार क्र. ०२ श्री नावाची मुलगी झाली. त्यावेळी गैरअर्जदार आम्हाला मुलगा हवा होता असे म्हणून अर्जदार क्र. ०१ च्या औषधोपचाराची काळजी न करता निघुन गेले. दि. ३०.०९.२०२२ रोजी अर्जदार क्र. ०१ ही अर्जदार क्र. ०२ हिचेसह तिचे सासरी गडचिरोली इथे गेली. त्यावेळी गैरअर्जदार तिचेकडून अवजड कामे करून घेत होते. अर्जदार क्र. ०२ ही सात महिन्याची असतांना अर्जदार क्र. ०१ ही दुस—या वेळेस गर्भवती राहिली व तिला शारिरीक व मानसिक त्रास, पोटात दुखने, रक्तस्त्राव, पाठीत व कमरेत दुखणे सुरू झाले. त्यामुळे दि. २९.०३.२०२३ रोजी ती जिल्हा रूग्णालय गडचिरोली येथे गेली, सोनोग्राफी रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर ती दोन महिन्याची गर्भवती होती व तिचा गर्भपात करण्याचा सल्ला गैरअर्जदार क्र. ०१ ला डॉक्टरांनी दिला. गैरअर्जदारांनी त्यास नकार दिला, परंतु अर्जदार क्र. ०१ ची प्रकृती दिवसेंदिवस बिघडत चालली होती, तिला रक्तस्त्रावाचा त्रास वाढत होता. परंतु गैरअर्जदार तिला दवाखाण्यात नेत नव्हते व तिला त्रास देत होते. त्यामुळे

तिने दि. १५.०४.२०२३ रोजी तिच्या वडीलांना फोन करून तिला होणा–या त्रासाबद्दल सांगितले. त्यानंतर तिचे वडील व काही प्रतिष्ठीत लोक दि. १७.०४.२०२४ रोजी तिचे सासरी गडचिरोली येथे आले. त्यावेळी गैरअर्जदार क्र. ०१ ने व इतर गैरअर्जदारांनी भांडण केले, त्यांना मुलगाच पाहिजे असा आग्रह करून अर्जदार क्र. ०१ चा गर्भपात करायचा नाही व तिला दवाखाण्यात न्यायचे नाही असे म्हणाले. त्यानंतर अर्जदार क्र. ०१ च्या वडीलांनी तिच्या प्रकृतीचा विचार करून निर्णय घ्यावा असे सुचविले. परंतु, गैरअर्जदार क्र. ०१ मानन्यास तयार नव्हता. त्यामुळे अर्जदार क्र. ०१ ने दि. १७.०४. २०२१ रोजी माहेरी जाण्यापुर्वी पोलीस ठाणे गडचिरोली येथे गैरअर्जदारां विरूध्द लेखी तक्रार दाखल केली. त्यानंतर सदरची तक्रार महिला समुपदेशन केंद्रात पाठविण्यात आली, तेथे गैरअर्जदारांना बोलवून त्यांना समज देण्यात आली. परंतु, गैरअर्जदार ऐकायला तयार नसल्यामुळे व अर्जदार क्र. ०१ ची प्रकृती बरी नसल्यामुळे ती अर्जदार क्र. ०२ ला घेउन तिच्या माहेरी आली.

३. अर्ज कथनानुसार अर्जदार क्र. ०१ ला जास्तीचा रक्तस्त्राव सुरू झाल्यामुळे व तिच्या पोटात दुखत असल्यामुळे दि. २२.०४.२०२३ रोजी ती डॉ. खोब्रागडे यांच्या दवाखाण्यात ब्रम्हपुरी येथे औषधोपचारासाठी गेली. डॉ. खोब्रागडे यांनी तिची तपासणी करून तिला दुस–या दिवशी दि. २३.०४.२०२३ रोजी बोलावले व तिला सांगण्यात आले की, गर्भपात केल्या शिवाय पर्याय नाही व तसे नाही केल्यास अर्जदार क्र. ०१ च्या जिवीताला धोका आहे. अर्जदार क्र. ०१ ने सदरची बाब गैरअर्जदार ०१ ला फोन करून सांगितली व त्याला दवाखाण्यात येण्यास सांगितले. परंतु तो दवाखाण्यात आला नाही. त्यामुळे तिने दि. २३.०४.२०२३ रोजी गर्भपात केला तेव्हा पासुन ती तिचे माहेरी वडीलांच्या घरी राहत असून गैरअर्जदार क्र. ०१ याने तिचे व गैरअर्जदार क्र. ०२ यांचे पालन पोषणाचे व्यवस्था केले नाही. गैरअर्जदार क्र. ०१ ला उत्पन्नाचे भरपूर साधन असून तो गर्भश्रीमंत आहे, त्याचा प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवसाय असून त्याच्या स्वसंपादित जमीनी आहेत, त्यापासून तो दवर्षी १० ते २० लाख

कमवितो व तो अर्जदारांच्या पालन पोषणाची व्यवस्था करण्यास सक्षम आहे. सबब, अर्जदाराने तिचेसाठी दरमहा १५ हजार रूपये व अर्जदार क्र. ०२ च्या पालनपोषणासाठी दरमाह ०५ हजार रूपये ची अंतरीम पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

४. गैरअर्जदारांनी निशाणी क्र. १४ खाली म्हणणे देउन अर्जास विरोध केला आहे. गैरअर्जदार क्र. ०१ याने त्याचा अर्जदार क्र. ०१ व ०२ यांचेशी नातेसंबंध मान्य केलेला आहे. गैअर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे दि. १०.०३.२०२३ रोजी अर्जदार क्र. ०१ ही तिचे माहेरी गेली होती व दि. २६.०३.२०२३ रोजी तिच्या वडीलांनी तिला तिचे सासरी गडचिरोली येथे आणले. दि. २९.०३.२०२३ रोजी अर्जदार क्र. ०१ ला अस्वस्थ वाटत असल्याबाबत तिने तक्रार केली. त्यानंतर तिला दि. २९.०३.२०२३ रोजी गैअर्जदार क्र. ०१ ने सामान्य रूग्णालय गडचिरोली येथे नेउन तिची सोनोग्राफी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार केली असता ती दोन महिन्यांची गर्भवती असल्याचे समजले. तिला दवाखाण्यातून आणल्यानंतर अर्जदार क्र. ०१ तिला दुसरे मुल नको आहे व गर्भपात करून घेउन असे म्हणू लागली. गैअर्जदार क्र. ०१ हा त्यासाठी तयार नव्हता. परंतु, अर्जदार क्र. ०१ दुसरे मुल जन्मास घालण्यास तयार नव्हती. तेव्हापासुन अर्जदार क्र. १ ही गैअर्जदार क्र. ०१ व इतर गैअर्जदारांना ती सहकार्य करत नव्हती. गैअर्जदार क्र. ०१ ने व त्याचे आई वडीलांनी गर्भपात करणे चांगले नाही असे सांगुन तिची समजून घालण्याचा प्रयत्न केला. परंतु, अर्जदार क्र. ०१ हिला पहिले मुल १० महिन्याचे असतांना दुसरे मुल होणे हि बाब शर्मेची होती. अर्जदार क्र. ०१ ही तिचे माहेरी जाउन गर्भपात करून घेईन असे म्हणत होती. परंतु, गैरअर्जदार क्र. ०१ हा त्यास तयार नव्हता. त्यामुळे गैरअर्जदार क्र. ०१ ने अर्जदाराचे आई वडीलांना बोलून तिला गर्भपात करू नये यासाठी समजावण्यास सांगितले, परंतु त्यांनी सुध्दा अर्जदाराचे समर्थन केले.

५. गैअर्जदाराचे म्हणण्यानुसार अर्जदार क्र. ०१ चे दुसरे गर्भावस्थेबाबत त्याचे विभागातील आशा वर्करला सांगण्यात आले होते व तिला देखील अर्जदार क्र. ०१ ने तिचा गर्भपात करू नये असे सांगण्याबाबत विनंती करण्यात आली. त्यानुसार त्याने

तिला समजावले होते, परंतु तरी देखील अर्जदार क्र. ०१ हे तिचा गर्भपात न करण्यात तयार नव्हती. दि. १७.०४.२०२३ रोजी दुपारच्या वेळीस अर्जदार क्र. ०१ चे वडील पाच सहा इसमांसह गैरअर्जदारांच्या घरी आले. त्यांनी गैरअर्जदाराच्या परिसरातील काही राजकीय महिलांना तेथे बोलाविले. त्यामध्ये गैरअर्जदार क्र. ०१ हा अर्जदार क्र. ०१ चे गर्भपातासाठी तयार नसल्याचे सांगितले. परंतु अर्जदाराचे वडील व इतर इसम हे तिचे गर्भपाताचा हट्ट धरत होते. त्यामुळे अर्जदार क्र. ०१ ने अर्जदार क्र. ०२ सह तिचे सासरचे घर सोडले. दि. १७.०४.२०२३ रोजी सायंकाळी ०५:०० च्या सुमारास गैअर्जदार क्र. ०१ ला पोलीस ठाणे गडचिरोली यांचा हजर राहण्यासाठी फोन आला. तेथे गैरअर्जदार क्र. ०१ व त्याचे वडील गेले असता पोलीसांनी त्याना अर्जदार क्र. ०१ चे बेकायदेशीर गर्भपात करण्यात दबाव टाकला. त्यास त्याने नकार दिला. त्यावेळी अर्जदार क्र. ०१ व ०२ तिचे आई वडीलांकडे गेले. दि १७.०४.२०२३ चे पुर्वी अर्जदार क्र. ०१ ची गैरअर्जदारां विरूध्द कौटुंबिक छळाची कसलीही तक्रार नव्हती. त्याचबरोबर दि. १७.०४.२०२३ चे तक्रारीमध्ये देखील तसा उल्लेख नव्हता. दि. १८.०४.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र. ०१ ने त्याचे लेखी म्हणणे पोलीस ठाणे गडचिरोली यांना सादर केले व तो अर्जदार क्र. ०१ चे गर्भपातास तयार नसल्याचे सांगितले. त्याचबरोबर त्याने अर्जदार क्र. ०१, ०२ व अर्जदार क्र. ०१ च्या गर्भावस्थेतील बाळाची पुरेशी काळजी घेण्याची तयारी दर्शविली. दि. २२.०५.२०२३ नंतर आशा वर्कर ही त्यांच्या घरी अर्जदार क्र. ०१ च्या गर्भावस्थेबाबत चौकशी करण्यासाठी आली असता ती अर्जदार क्र. ०१ हिला फोनवर बोलली असता अर्जदार क्र. ०१ ने तिला गर्भपात केला असल्याबाबत फोनवर सांगितले तेव्हा गैरअर्जदार क्र. ०१ ला अर्जदार क्र. ०१ ने त्याच्या संमती शिवाय गर्भपात केल्याचे समजले व त्याने त्याबाबत गडचिरोली पोलीसांकडे तक्रार केली.

६. पोलीस ठाणे गडचिरोली यांनी गैअर्जदार क्र. ०१ चे तक्रारीविरूध्द कसलीही कार्यवाही केली नसल्यामुळे त्याने पोलीस ठाणे गडचिरोली यांना माहिती

अधिकार कायदयानुसार अर्ज केला. दि. १८.१०.२०२३ रोजीचे पोलीसांचे माहितीनुसार पोलीस ठाणे अर्जदार क्र. ०१, तिचे वडील, आई व भाउ यांचे जबाब नोंदविले. त्यानुसार अर्जदार क्र. ०१ चे गैरअर्जदारांविरूध्द कौटुंबिक छळाची कसलींही तक्रार नव्हती व त्यानुसार अर्जदार क्र. ०१ ने स्वत:हून तिचा गर्भपात केला आहे. त्याचबरोबर पोलीसांनी गोळा केलेले वैद्यकीय कागदपत्रानुसार अर्जदार क्र. ०१ हिला गर्भावस्थेमध्ये कसलीही अडचण नव्हती व तिला दि. २३.०४.२०२३ रोजी डॉ. खोब्रागडे यांचे दवाखाण्यात ब्रम्हपुरी येथे दाखल होउन त्याच दिवशी तिला दवाखाण्यातून सोडण्यात आले आहे. तिचे डिसचार्ज समरी नुसार तिला दोन गोळया दिवसांतून दोन वेळा ०५ दिवसांसाठी देण्यात आल्या होत्या. त्यानुसार असे दिसून येते की, अर्जदार क्र. ०१ हिने निघृणपणे कोणत्याही कारणाशिवाय तिचा गर्भपात केला आहे. गैरअर्जदार क्र. १ हा त्यास नकार देत होता, तिने तिच्या बाळाचा गर्भपात करण्यासाठी तिच्या वडीलांची मदत घेतली व विनाकारण गर्भपात केला. त्याबाबत, गैरअर्जदार क्र. ०१ याने दि. २९.११.२०२३ रोजी पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचेकडे तक्रार केली आहे. अश्या प्रकारे गैरअर्जदार क्र. ०१ याने अर्जदार क्र. ०१ हिचेवर कसल्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार केला नाही. त्याचप्रमाणे अर्जदार क्र. ०१ हिचा गैरकायदेशीर गर्भपातास विरोध करणे कौटुंबिक हिंसाचाराखाली येत नसल्याने तो अर्जदार क्र. ०१ हिला अंतरिम अथवा कसल्याही प्रकारची पोटगी देण्यास जबाबदार नाही. अर्जदार क्र. ०१ हिने तिचे सासरचे घर अर्जदार क्र. ०२ सह पोलीसांना दि. १७.०४.२०२४ ची फिर्याद देउन सोडले आहे. त्याचबरोबर गैरअर्जदारांचे अर्जदार क्र ०१ हिला मुलगा हवा आहे अशी देखील ईच्छा नव्हती व तशी तक्रार तिने केली नाही. सबब, गैरअर्जदारांनी अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७. अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ रूपाली माकडे व गैरअर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ एल. जेम्स यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती रूपाली माकडे यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र. ०१ हिला दि. ०७.०६.२०२२

रोजी अर्जदार क्र. ०२ ही सिझेरीयन द्वारे झाली होती. त्यानंतर ती दि. २३.०९.२०२२ रोजी तिचे सासरचे घरी गडचिरोली येथे गेली. दि. २९.०३.२०२३ रोजी ती दोन महिन्याची गर्भवती असल्याचे समजले. डॉक्टरांनी तिला गर्भपात करण्याचा सल्ला दिला, गैरअर्जदार त्यास नकार देत होते. दि. १७.०४.२०२३ रोजी तिचे वडील तिचे सासरची घरी आले, गैरअर्जदाराने तिचा गर्भपात करण्यास नकार दिला, त्यामुळे तिने दि. १७.०४.२०२३ रोजी गैरअर्जदारां विरूध्द गडचिरोली येथे फिर्याद दिली आहे. दि. २३.०४.२०२३ रोजी अर्जदार क्र. ०१ ने तिला होत असलेल्या त्रासामुळे डॉ. खोब्रागडे यांच्या दवाखाण्यातून ब्रम्हपुरी येथे गर्भपात करून घेतला आहे. सबब, गैरअर्जदार क्र. ०१ याचेकडून अर्जदार क्र. ०१ व ०२ यांना अनुक्रमे रूपये १५,०००/– व रूपये ५,०००/– अंतरिम पोटगी मंजुर करण्याची विनंती केली आहे. गैरअर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ एल. जेम्स यांचा युक्तीवाद ऐकला.

८. अर्जदाराने अर्जाच्या समर्थनार्थ निशाणी क्र. १६ खाली कागदपत्रे दाखल केली आहेत. गैरअर्जदार क्र. ०१ याने अर्जदारांशी त्याचा नातेसंबंध मान्य केला आहे. अर्जदाराने निशाणी क्र. १६ अनुक्रमांक ०२ दि. १७.०३.२०२३ रोजीचे डॉ. एफ. बी. रामटेके, कुरखेडा यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र निर्गमित केले असून त्यानुसार अर्जदार शारदा महेश कावळे हिचा पाठीचा खालील भाग दुखत असल्यामुळे तिला योग्य ते उपचार घेउन दि. १७.०३.२०२३ नंतर आराम करण्याचा सल्ला देण्यात आल्याचे दिसून येते. निशाणी क्र. १६ अनुक्रमांक ०३ वरील डॉ. खोब्रागडे हॉस्पीटल यांचे डिसचार्ज कार्ड दि. २३.०४.२०२३ ची छायांकित प्रत दाखल केली आहे. अर्जदाराने निशाणी क्र. १६ अनुक्रमांक ०४ ते १० वर गैरअर्जदारांच्या मालमत्तेसंबंधी कागदपत्रे दाखल केली आहेत. अनुक्रमांक ०४ ते ०८ वर दि. ०७.०२.२०२४ चा गैरअर्जदार क्र. ०२ प्रकाश पंडीतराव कावळे आणि गैरअर्जदार क्र. ०३ शशीकला प्रकाश कावळे यांचे गडचिरोली येथील गाव नमुना नंबर ०८ अ, भुमापन क्र. ७४ चा सात बारा उतारे ज्यामध्ये प्रकाश पंडीतराव कावळे यांचे नाव कमी करून त्या ठिकाणी संजय आंनदराव

खोब्रागडे यांचे नाव फेरफार क्र. ५९५२ नुसार लागल्याचे दिसते. त्याचबरोबर गैरअर्जदार क्र. ०३ चे नावे भमापन क्र. २८० मौजा गडचिरोली यांचा ०१ हेक्टर ३४ आर. क्षेत्र असल्याचे दिसते. अनुक्रमांक १० वर गैरअर्जदार क्र. ०१ महेश व त्याचा भाउ गैरअर्जदार क्र. ०४ भुषण प्रकाश कावळे यांचे नावे नवीन वार्ड क्र. ०१ मधील मालमत्ता व कर आकारणी तक्ता नगर परिषद गडचिरोली यांची छायांकित प्रती अश्या सर्व छायांकित प्रती दाखल केल्याचे दिसते. वरील कागदपत्राचे अवलोकन केले असता गैरअर्जदार क्र. ०१ महेश प्रकाश कावळे याचे नावावर अनुक्रमांक १० वरील सामायीक मिळकती शिवाय इतर कसलेही कागदपत्र दाखल करण्यात आले नाही. त्याचबरोबर अर्जदाराने तिचे मत्ता व दायीत्व याचे शपथपत्र दाखल केलेले नाही. त्याचबरोबर अर्जदाराने नि.क्र. २१ खाली गैरअर्जदारांचे मालमत्तेसंबंधी कागदपत्रे दाखल केली आहेत. अर्जदार क्र. ०१ ने तिचे मत्ता व दायित्वाचे शपथपत्र दिले नाही.

९. गैरअर्जदारांनी नि.क्र. १३ खाली कागदपत्रे दाखल केली आहेत. गैरअर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एल. जेम्स यांनी असा युक्तीवाद केला की, सोनोग्राफी रिपोर्ट पान क्र. २१ व २२ नुसार अर्जदार क्र. ०१ दि. ३१.०३.२०२३ रोजी ०२ महिन्याची गर्भवती होती व त्यानुसार तिला स्वत:हून गर्भपात करावयाचा होता. गैरअर्जदार क्र. ०१ याने दि. ०५.०६.२०२३ रोजी पान क्र. १९ नुसार पोलीस ठाणे गडचिरोली येथे त्याला दि. २२.०५.२०२३ रोजी आशा वर्कर चौकशीसाठी आली असता तिने अर्जदार क्र. ०१ ला फोन केला व तिने तिचा गर्भपात केल्याचे त्याला माहिती मिळाली असे त्यामध्ये त्याने नमुद केल्या असल्याचे व संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करण्यासंबंधी तक्रार लिहिल्याचे कथन केले.

१०. गैरअर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ यांनी असे कथन केले की, नि.क्र. ०१ खाली अर्जातील परिच्छेद क्र. ०९ मधील मजकूर दि. २२.०४.२०२३ रोजी अर्जदार क्र. ०१ हे डॉ. खोब्रागडे मॅडम ब्रम्हपुरी येथे औषधोपचारासाठी गेली व दि. २३.०४.२०२३

रोजी त्यांनी तपासणी करून सांगितले की, गर्भपात केल्याशिवाय पर्याय नाही. पान क्र. २८ वरील अर्जदार क्र. ०१ चे वडील भास्कर शिवराम देशमुख यांचे बयाणानुसार अर्जदार क्र. ०१ ही दोन महिन्याची गर्भवती असून तिला खूप त्रास होत आहे, तुम्ही मला नेण्यासाठी या अशी म्हणाल्याने ते अर्जदार क्र. ०१ ला घेण्यासाठी गडचिरोली येथे गेले व त्याच दिवशी कुरखेडा येथे आले तेव्हापासुन अर्जदार क्र. ०१ ही कुरखेडा येथे राहत असतांना तिला खुप त्रास होत आहे, ती गर्भपात करते अशी ती म्हणत आहे, परंतु तिला गर्भपात करण्यास कोणतीही संमती दिली नाही, अंदाजे ०४–०५ महिन्यापुर्वी अर्जदार क्र. ०१ हिने डॉक्टरांकडे जाउन गर्भपात केला, तिने कोणत्या डॉक्टरांकडे जाउन गर्भपात केला याबाबत त्यांना काहीही माहिती नाही, तिने स्वमर्जीने गर्भपात केला आहे व त्यांनी तिच्या गर्भपातास संमती दिली नाही असे नमुद केले आहे.

११. पान क्र. ३१ वरील अर्जदाराचे डिसचार्ज कार्ड दि. २३.०४.२०२३ चे अवलोकन केले असता अर्जदार क्र. ०१ ही दि. २३.०४.२०२३ रोजी डॉ. खोब्रागडे हॉस्पीटल ब्रम्हपुरी येथे दाखल झाली व त्याच दिवशी तिचा डिसचार्ज करण्यात आला. पान क्र. ३३ वरील डॉ. खोब्रागडे यांचे प्रिसक्रिसीपशन नुसार दि. २३.०४.२०२३ रोजी दोन गोळया पाच दिवसासाठी देण्यात आल्या. नि.क्र. ३४ वरील पोलीस ठाणे गडचिरोली यांनी दि. ११.१०.२०२३ रोजी दिलेल्या समजपत्रावरून अर्जदार क्र. ०१ ही गर्भवती राहिल्यापासुन तिचे नातेवाईक गैरअर्जदार क्र. ०१ यास फोनद्वारे व प्रत्यक्ष घरी येउन तिचा गर्भपात करण्यास दबाव टाकत होते. दि. १७.०४.२०२३ रोजी गैरअर्जदार क्र. ०१ याने गर्भपातास विरोध केला व अजुनपर्यंत त्याचा गर्भपातास विरोध आहे असे बयाणात सांगितले असुन त्याने केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने अहवाल तयार करून त्याची तक्रार दफतर दाखल करण्यात येत आहे असे नमुद केले आहे. सबब, गैरअर्जदार यांचे विद्वान विधीज्ञ यांनी कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदयाचे कलम ०३ नुसार कोणतीही स्त्री स्वत:हून तिचे माहेरी राहत असल्यास

सदरची बाब कौटुंबिक हिंसाचारामध्ये येत नाही असे म्हणून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. गैरअर्जदाराने निशाणी क्र. १३ पान क्र. ४० वर त्याचे मत्ता व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे.

१२. निशाणी क्र. १३ खालील कागदपत्राचे एकत्रित वाचन केले असता अर्जदार क्र. ०१ हिला तिचा दुसरे मुलाचा गर्भपात करण्याची इच्छा होती, गैरअर्जदार क्र. ०१ व त्याचे कुटुंबियांना सदरचा गर्भपात करणे नको होते, अर्जदार क्र. ०१ हिने त्याचे विरूध्द गर्भपात करू देत नसल्याबाबत पोलीस ठाणे गडचिरोली येथे दि. १७.०४.२०२३ रोजी तक्रार केली आहे, परंतु गैरअर्जदारांविरूध्द दि. १७.०४.२०२३ पुर्वी तिने कौटुंबिक छळ केल्याचे तक्रार केल्याचे तकृतदर्शनी दिसुन येत नाही. त्याचबरोबर गैरअर्जदाराने अर्जदार क्र. ०१ हिचे गर्भपातास विरोध केल्यामुळे त्याने केलेल्या तक्रारीच्या चौकशी दरम्यान तिचे वडील भास्कर शिवराम देशमुख यांनी तिला त्रास होत असल्यामुळे तिने गैरअर्जदार क्र. ०१ याचे संमतीशिवाय गर्भपात केल्याचे व ती तिचे मर्जीने तिचे माहेरी कुरखेडा येथे राहत असल्याचे दिसते. त्याचबरोबर, डॉ. खोब्रागडे यांचे डिसचार्ज कार्ड दि. २३.०४.२०२३ चे अवलोकन केले असता ती दि. २३.०४.२०२३ रोजी डॉ. खोब्रागडे यांचे दवाखाण्यात दाखल झाली, त्याच दिवशी तिचा गर्भपात केला असल्याचे व त्यास गैरअर्जदार क्र. ०१ याची संमती नसल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, अर्जदार क्र. ०१ हिचा गैरअर्जदार क्र. ०१ व त्याचे कुटुंबियांनी कौटुंबिक छळ केला असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत नाही. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे तिला पाठदुखीचा त्रास होता, परंतु अर्जदाराने निशाणी क्र. १६ खाली दाखल केलेले डॉ. एफ. बी. रामटेके यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र दि. १७.०३.२०२३ चे प्रमाणपत्रामध्ये त्याबाबत उल्लेख केला असला तरी तिने योग्य ते उपचार घ्यावेत व आराम करावा असे त्यात नमुद केले आहे, परंतु अर्जदार क्र. ०१ हिचा गर्भपात करावा असे नमुद केले नाही. सबब, सकृतदर्शनी अर्जदार क्र. ०१ हिचा गर्भपात करणे आवश्यक होते व त्यामुळे तिने तिचा गर्भपात केला असे सकृतदर्शनी दिसुन येत नाही.

१३. अर्जदार क्र. ०१ हिने गैरअर्जदार क्र. ०१ याचे संमती शिवाय कोणत्याही वैद्यकीय तातडीचे कारणाशिवाय गर्भपात केला व त्यामुळे तिचे व गैरअर्जदार क्र. ०१ यांचे वाद असल्यामुळे ती स्वमर्जीने माहेरी राहते असे सकृतदर्शनी दिसते. परंतु, सदरची बाब ही कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम ०३ प्रमाणे असलेल्या व्याख्येमध्ये बसत असल्याचे दिसत नाही. त्याचबरोबर प्रस्तुतचे अर्जाव्यतिरिक्त तिने दि. १७.०४.२०२३ शिवाय इतर कोणतीही तक्रार गैरअर्जदारांविरूध्द कौटुंबिक छळाबाबत केली नसल्याचे सकृतदर्शनी दिसते.

१४. अर्ज कथन व गैरअर्जदारांचे म्हणणे नि.क्र. १२ चे अवलोकन केले असता अर्जदार क्र. ०१ व गैरअर्जदार क्र. ०१ यांना अर्जदार क्र. ०२ श्री महेश कावळे ही दोन वर्षाची मुलगी असल्याचे दिसते. अर्जदार क्र. ०१ ही दि. १७.०४.२०२३ पासुन उभयपक्षातील गर्भपाताचे कारणावरील वादामुळे तिचे माहेरी राहत असल्यामुळे साहजीकच गैरअर्जदार क्र. ०२ हिला सुध्दा तिच्या आईसोबत राहावे लागते. गैरअर्जदार क्र. ०१ याने सकृतदर्शनी अर्जदार क्र. ०१ हिचा कौटुंबिक छळ केला असे सिध्द न झाल्यामुळे व सकृतदर्शनी ती स्वमर्जीने तिचे माहेरी राहत असल्यामुळे तिला अंतरिम पोटगी मंजुर करता येत नाही. परंत, गैरअर्जदार क्र. ०१ हा अर्जदार क्र. ०२ हिचा पिता असल्या कारणाने तिचे पालन पोषण करण्याची त्याची जबाबदारी आहे. त्याचबरोबर तो ३४ वर्षाचा उमदा तरूण असल्याने तो त्याच्या मुलीचे पालन पोषण करण्यास सक्षम आहे. सबब, उभयपक्षाचे राहणीमानानुसार अर्जदार क्र. ०२ हिला दरमहा रक्कम रू. ३,०००/– अंतरिम पोटगी देणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करित आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र. ११ अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र.२ हिला दरमहा रक्कम रू. ३,०००/– अर्ज

दाखल तारीख दि. २१.०६.२०२४ पासुन अर्जाचे अंतिम निकालापावेतो अंतरीम पोटगी दयावी.

या आदेशाची प्रत विना मुल्य दोन्ही पक्षाकारांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2024.12.20 12:53:38 +0530

दिनांक : १८/१२/२०२४

(एन. पी. देशपांडे),
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
कुरखेडा